पुणे महानगरपालिका

आरोग्य खाते

जाहिरात क्र. १/६३४

दि.२४/०८/२०२६

थेट मुलाखत (Walk in Interview)

आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, पुणे येथे पुणे महानगरपालिका / शासकीय / निमशासकीय (गट-अ) सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा "विशेष कार्य अधिकारी" पदासाठी करार पध्दतीने मानद स्वरुपात उपलब्ध करुन घेणेकरीता थेट मुलाखतीने नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

पद : विशेष कार्यकरी अधिकारी/सहाय्यक आरोग्य अधिकारी (गट-अ)

मुलाखतीचा दिनांक : ३१/०८/२०२६

वेळ : 12.00 pm

ठिकाण : पुणे मनपा

वय : वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे

| अ.क्र. | विभाग | पद संख्या | पदनाम | अर्हता, अनुभव व कामकाजाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य विभाग | १ | विशेष कार्यकरी अधिकारी/सहाय्यक आरोग्य अधिकारी (गट-अ) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय शाखेची पदवी (M.B.B.S).<br>आ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्रतिबंधक आणि सामाजिक औषध शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (MD. (PSM)/M.D./M.S.) किंवा सार्वजनिक आरोग्य मधील पदव्युत्तर पदविका (DPH).<br>इ) अनुभव : आरोग्य विषयक प्रकल्प जसे पब्लीक-प्राव्हेट - पार्टनरशीप (पीपीपी) प्रकल्प किंवा joint venture (संयुक्त विदयमाने ) महानरपालिकांमध्ये राबविण्याचा किमान ७ (सात) वर्षाचा अनुभव |

अटी व शर्तीः

१) सदर नियुक्तीकरीता शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा (गट-अ) करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेला शासन निर्णय क्र. सीबीई १५२५/प्र.क्र. ३७/आस्थामं (का १३) दिनांक १० जून, २०२५ नुसार मानधन देय असेल.

२) सदर नियुक्तीकरिता दिनांक १० जून, २०२५ मधील तरतुदीप्रमाणे मानधन व भत्ते देय राहतील या व्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३) सदर नियुक्ती विद्यापीठ निधीतून तात्पुरत्या स्वरुपात असून नियमित स्वरुपाची नसल्याने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेद्वाराचे विद्यापीठ नियमित सेवेत समावेशन होणार नाही व याअनुषंगिक नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ, रजा रोखीकरण इ. अनुज्ञेय असणार नाही, त्यावर हक्क सांगता येणार नाही.

४) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, याबाबत नियुक्ती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याने बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक असेल. तसेच, सदर बंधपत्रात जाहिरातीत नमूद व विद्यापीठाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही असा उल्लेख करणे आवश्यक राहील.

५) सदर बंधपत्र/हमीपत्र प्राप्त झाल्यानंतरच संबंधित अधिकाऱ्यास तात्पूरते नियुक्ती आदेश देण्यात येईल.

६) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांचे कामकाजाचा आढावा घेवून कामाचे मूल्यमापन केले जाईल. नियुक्तीची आवश्यकता व संबंधितांची सेवा समाधानकारक असल्यास वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नियुक्तीचे नुतनीकरण करण्यात येईल. मात्र, नियुक्तीचा एकूण कालावधी तीन वर्षपेक्षा अधिक असणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस वय वर्ष ६५ नंतर नियुक्ती देण्यात येणार नाही.

८) करार पध्दतीने नियुक्त करावयाची व्यक्ती शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावी. तसेच, प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

९) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील.

११) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या / विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

१२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा उमेद्वाराच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

१४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

१५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले जाणार नाहीत.

१८) मुलाखतीकरिता येणाऱ्या उमेदवारांनी खालील मूळ कागदपत्रे व त्यांच्या २ प्रतीं स्व-साक्षांकित करून सोबत आणाव्यात.

अ) जन्मतारखेचा पुरावा

आ) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र

इ) शासकीय/निमशासकीय/स्वायत्त संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्तीचे दस्तऐवज

ई) माजी सैनिक असल्यास डिस्चार्ज बुक

उ) निवृत्ती वेतनासंबंधी दस्तऐवज, शेवटची वेतन पावती

ऊ) संगणक साक्षरता प्रमाणपत्र (असल्यास)

ऋ) अनुभव प्रमाणपत्र

१९) उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२०) मुलाखतीपूर्वी मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. पात्र झालेल्या उमेद्वारांनाच मुलाखतीकरीता पाचारण करण्यात येईल.

२१) उमेदवारास आरोग्य विषयक प्रकल्प जसे पब्लीक- प्राव्हेट- पार्टनरशीप (पीपीपी) प्रकल्प किंवा joint venture (संयुक्त विदयमाने) महानरपालिकांमध्ये राबविण्याचा किमान ७ (सात) वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

२२) विहित दिनांक व वेळेत उपस्थित न झालेल्या उमेद्वारांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२३) जाहिरातीत नमूद केलेले पद भरणे किंवा न भरणे याचा हक्क मा.महापालिका आयुक्त पुणे मनपा यांचेकडे राखून ठेवलेला आहे.

२४) सदर भरती प्रक्रियेअंतर्गत पदसंख्येत बदल करणे, मुलाखत स्थगित अथवा रद्द करणे इ. अन्य कोणत्याही तांत्रिक अडचणी याबाबत निर्णय घेण्याचा सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त पुणे मनपा यांचेकडे राखून ठेवीत आहे. सदर भरतीप्रक्रियेबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेद्वारांकरीता बंधनकारक राहील.

ठिकाण : पुणे

दिनांक : २४/०८/२०२६

(नीना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका